Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# मुंबई विद्यापीठांतर्गत येणा-या रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या आर्थिक स्त्रोतांचा चिकित्सात्मक अभ्यास

**श्री.कमलाकर मधुकर सावंत**
ग्रंथपाल, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लांजा

**प्रस्तावना**

ग्रंथालय ही प्रत्येकाच्या जीवनातील एक अशी सामाजीक संस्था आहे जेथे प्रत्येक व्यक्ती आपली ज्ञानाची भूक भागवू शकतो.ग्रंथालय इतर औद्योगिक संस्थांप्रमाणे फलित म्हणून मालाच्या स्वरुपातील उत्पादन निर्माण करीत नाही तर ती सेवांचे उत्पादन करते. आधुनिक ग्रंथालये ही केवळ माहिती व ज्ञानाचे भांडार नसून ती एक कार्यप्रवण संस्था आहे. परंतु आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पारंपारिक वाचन साहित्या बरोबरच ई-स्वरुपातील वाचनसाहित्याची (e-book, e-journals व e-resources)मागणी वाचकांकडून मोठया प्रमाणात होत असते. महाविद्यालयीन ग्रंथालय हे महाविद्यालयाच्या ध्येय व धोरणांशी बांधिल असते. ते विद्यार्थ्यांना नवनवीन ज्ञान व माहिती मिळविण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असते.पाठयपुस्तकांचे वाचनाने एखादया विषयाचे पुरेसे अवलोकन होवू शकत नाही त्यासाठी ग्रंथालयातील विविध संदर्भांचा आधार घेणे क्रमप्राप्त ठरते. तसेच माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान, संगणकिकरण, ई -रिसोर्सेस, डेटाबेसेस, कन्सोर्शिया व एन.लिस्ट सारख्या विविध सेवा व परिपूर्ण वाचनसाहित्य विकास करुन वाचकांना उत्कृष्ट सेवा देण्या करता वित्तपुरवठयाची अत्यंत आवश्यकता ग्रंथालयांना असते. ग्रंथालयाकडे उपलब्ध असलेले आर्थिक स्त्रोत हे प्रशासन व संघटनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

महाविद्यालयीन ग्रंथालयाचा विकास होण्यासाठी वाचन संग्रह, प्रशिक्षीत कर्मचारी व इमारत या तीन अत्यंत महत्त्वाच्या बाबी आहेत. ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था असल्यामुळे तिचा सतत विस्तारच होत असतो. वाचनसाहित्य, ग्रंथालयातील कपाटे, फर्निचर, कॉम्प्युटरर्स व इतर पायाभूत सुविधांमध्ये वाढ होतच राहते.अशावेळी ग्रंथालयांकडे असलेल्या विविध आर्थिक स्त्रोतांचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला वित्तपुरवटा करणारे काही आर्थिक स्त्रोत आहेत. त्यामध्ये यु.जी.सी.कडून मिळणारे अनुदान, राज्यशासनाकडून मिळणारे अनुदान, महाविद्यालयाच्या पालकसंस्थेकडून काही प्रमाणात मिळणारे अनुदान आणि महाविद्यालयाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे असलेले विद्यार्थ्यांचे ग्रथालय शुल्क तसेच थोडयाफार प्रमाणात ग्रंथालयाकडून विविध सेवा देऊन मिळविलेली रक्कम व भेट किंवा देणगी स्वरुपात मिळालेली रक्कम इ.आर्थिक स्त्रोत उपलब्ध होऊ शकतात.

**संशोधनाची गरज व राष्ट्रीय महत्त्व** (Origin of the Research & National Importance) :

केंद्र सरकारची व विद्यापाठ अनुदान आयोगाची उच्च शिक्षणासंदर्भाती धोरणे ही वारंवार बदलत आहेत. अनुदानामध्ये कपातीचे धोरण सरकारने अंगिकारले आहे.अनुदानित / विनाअनुदानित पध्दतीमध्ये ग्रंथालये कशी चालविली जातात. त्यासाठी कोण कोणत्या आर्थिक स्त्रोतांचा वापर केला जातो ते पहाणे योग्य ठरेल.

आज रत्नागिरी जिल्हयातील मुंबई विद्यापीठांतर्गत असलेली सर्वच महाविद्यालये अनुदानीत स्वरुपाची नाहीत. तर बरीचशी विनाअनुदानीत तत्वावर चालविली जात असून इतर आर्थिक स्त्रोत उपलब्ध नसल्यामुळे खुप कष्टाने व काटकसरीने चालविली जातात. अशा महाविद्यालयांना ग्रंथालयावर खर्च करणे शक्य होत नाही. अशावेळी रत्नागिरी जिल्हयातील सर्व महाविद्यालयातील ग्रंथालयाचे वित्तीय व्यवस्थापन कसे केले जाते ? तेथे कोणकोणते आर्थिक स्त्रोत आहेत ? त्यांचा विनियोग कश्या प्रकारे केला जातो ? त्यांचे नियोजन व नियंत्रण कसे केले जाते ? या सर्वाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी सदरचा विषय हा निवडलेला आहे.

मुंबई विद्यापीठातंर्गत येणारी मुंबईतील महाविद्यालये व रत्नागिरी जिल्हयातील काही महाविद्यालये सोडून इतर महाविद्यालये ही आर्थिकदृष्टया सक्षम नाहीत. त्यामुळे मुंबईतील विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या सर्व पायाभूत सोयी व सुविधा मध्ये व रत्नागिरी सारख्या ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या सुविधामध्ये बरीच तफावत आहे. म्हणूनच रत्नागिरीतील मुले शहरातील मुलांच्या पुढे स्पर्धेत टिकाव धरताना दिसत नाहीत. अजूनही ग्रंथालयांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. उपलब्ध असलेला स्टाफ, वाचनसाहित्य खरेदी, ई - रिसोर्सेस संगणकिकरण इत्यादी करणे शक्य होत नाही. म्हणूनच प्रस्तुत विषयाचा अभ्यास करुन याभागातील ग्रंथालयांचा आर्थिक समस्याचा अभ्यास करायचा आहे.

- **संशोधनाची उददीष्टये** (Objectives of the Research) :
  १. महाविद्यालयीन ग्रंथालयांच्या आर्थिक स्त्रोतांचा अभ्यास करणे.
  २. ग्रंथालयांकडून केले जाणा-या विविध खर्चाचा आढावा घेणे.
  ३. ग्रंथालयातील वाचनसाहित्य विकास व त्याचे स्वरुप यांचा आढावा घेणे.
  ४. ग्रंथालयामध्ये झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा आढावा घेणे.
  ५. ग्रंथालयांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
  ६. वित्तपुरवटयाशी संबधित असलेल्या विविध ग्रंथालयीन सेवांचे मुल्यमापन करणे.
- **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा** (Scope and Limitation of Research

  सदर संशोधनात रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालयीन ग्रंथालयांपुरते मर्यादित आहे.रत्नागिरी जिल्हयामध्ये एकूण २० महाविद्यालये आहेत. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आर्थिक स्त्रोतांचा अभ्यास येथे करण्यात येणार आहे. सदर संशोधनासाठी सन २०१८-१९ ते सन २०२२-२३ या पाच वर्षाची माहिती संकलित करण्यात येणार आहे.
- **संशोधन पध्दती व माहिती संकलन** (Research Methodology & Data Collection ) :

  मुंबई विद्यापीठांतर्गत येणा-या रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेल्या आर्थिक स्त्रोतांचा चिकित्सात्मक अभ्यास हा विषय निवडलेला असल्यामुळे संबधित सर्व महाविद्यालयांची माहिती मिळवून वस्तूस्थिती स्पष्ट करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मागिल पाच वर्षाची माहिती मिळविण्यासाठी सर्व महाविद्यालयांना प्रश्नावलर वितरीत करण्यात येणार आहेत. प्रसंगी मुलाखत तंत्राचाही वापर करण्यात येणार आहे.

**महाविद्यालयीन ग्रंथालयामधील आर्थिक स्त्रोतांशी संबंधित घटक** :

महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये समृध्द ग्रंथसंग्रह व नियतकालिके संग्रहीत करण्यासाठी ग्रंथालयसेवकांचा पगार, ग्रंथालय इमारत बांधणे, दुरुस्ती यासाठी निधी उपलब्ध होतो. ग्रंथालयाचे विद्यार्थी प्राध्यापक व इतर वाचकांना सेवा देण्यासाठी व ग्रंथालयाच्या विकासासाठी विविध मार्गानी पैसा उपलब्ध होत असतो. हा पैसा महाविद्यालयीन व विद्यापीठाच्या स्वरुपानुसार ठरत असतो. उदा.ग्रंथालय सेवा, पगार,स्टेशनरी इ.साठी पुढील मार्गानी आर्थिक स्त्रोत उपलब्ध होत असतो.

आर्थिक स्त्रोत :

१. पालक संस्थांकडून महाविद्यालयाकडून मिळणारे अनुदान : ग्रंथालयाच्या विकासासाठी पालकसंस्था काही निधी उपलब्ध करुन देत असतात जेणेकरुन ग्रंथालये ही आर्थिक दृष्टया सक्षम होवून ग्रंथालयातील वाचकांना विविध सेवा व सुविधा देवू शकतील.

२. विद्यापीठ अनुदान आयोग : १९५३ मध्ये भारत सरकारने भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी यु.जी.सी.ची स्थापना केली. सर्जंट समितीच्या शिफारशीनुसार भारतीय शिक्षणाचा आढावा घेण्यासाठी इ.स.१९४५ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९४२ मध्ये डॉ. एस.आर.राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ आयोगाची स्थापना केली. केंद्र सरकारने सार्वजनिक

निधी हा विद्यापीठ आयोगाला किंवा उच्च शिक्षणाकरीता देण्यासाठी १९५२ मध्ये सर्व चौकशी विद्यापीठ अनुदार आयोगामार्फत करण्यात येईल असे सुचविले.२८ डिसेंबर १९५३ रोजी स्व.मौलाना अब्दुल कलाम आझाद तत्कालिन शिक्षणमंत्री यांच्या हस्ते या आयोगाचे उदघाटन करण्यात आले.सन १९५६ साली स्थापन झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे डॉ.चिंतामणराव देशमुख हे अध्यक्ष होते. सदया विद्यामान अध्यक्ष सुखदेव थोरात हे आहेत.

१.यु.जी.सी.कडून दिले जाणारे अनुदान - शैक्षणिक क्षेत्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्रत्येक योजनेतर्गत पुढील घटकांकरीता अनुदान दिले जाते.

i. अभ्यासकेंद्र - तिस-या पंचवार्षिक योजनेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने अभ्यासकेंद्रे स्थापन करण्याचे ठरविले. अशा माध्यमातून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना योग्य अशी ग्रंथालयीन सेवा उपलब्ध व्हावी हा हेतू होता.

ii. बुकबॅंक -१९६३ -६४ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग महाविद्यालयीन ग्रंथालयांना क्रमिक पुस्तकांच्या अनेक प्रति खरेदी करण्याकरीता अनुदान देते. अनुदान देताना या उपक्रमामध्ये विद्यार्थीसंख्या विचारात घेतली जाते.

iii. प्रादेशिक ग्रंथालय केंद्र - १९७६ मध्ये भारतात भरविण्यात आलेल्या कुलगुरुंच्या संमेलनात भारताच्या सर्वागिण विकासासाठी शिक्षणाची आणि ग्रंथालय सेवांची आवश्यकता याविषयावर चर्चा भरविण्यात आली होती.याअनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने एका समितीची स्थापना केली. या समितीने मुंबई. कलकत्ता, बेंगलोर व बनारस या विद्यापीठांमध्ये प्रादेशिक ग्रंथालय केंद्रे स्थापन करण्याची शिफारस केली होती.

iv. राष्ट्रीय माहितीसेवा केंद्र - सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने विविध विद्याशाखांना अद्ययावत माहिती पुरविण्यासाठी तीन राष्ट्रीय माहिती सेवा केंद्रांची स्थापना केली.

v. वाचन साहित्य विकास केंद्र - भारतामध्ये कार्यरत असणा-या सर्व महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग वाचन साहित्य खरेदी करण्याकरीता १००% अनुदान देते. महाविद्यालयीन ग्रंथालयाना अनुदान मिळण्याकरीता त्यांना पुढील पाच वर्षामध्ये आवश्यक असणा-या रक्कमेबाबतचा प्रस्ताव आयोगाला सादर कराव लागतो.

vi. COSIP आणि COSHSSP - ही योजना फक्त महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी आहे.विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवीपुर्व शिक्षणामध्ये सर्वांगिण सुधारणा घडवून आणण्यासाठी हया दोन योजना सादर केल्या आहेत. COSIP (College Science Improvement Programmer) आणि COSHSSP(College Humanities and Social Sciences Improvement Programmer )

vii. ग्रंथालय इमारत - समधानकारक ग्रंथालयसेवा देण्यासाठी उत्तम इमारत,फर्निचर आधुनिक उपकरणे यांची आवश्यकता भासते. विद्यापीठ अनुदान आयोगाने गहू खरेदी योजनेंतर्गत ग्रंथालय इमारतीच्या विकासासाठी अनुदान दिले आहे.

viii. संगणक - ग्रंथालयाच्या चांगल्यासेवेसाठी संगणकाला अनन्य साधारण महत्व आहे.संगणकाच्या वापरामुळे कामाच्या क्षमतेत वाढ झाली. म्हणून विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये एक संगणक देण्याची व्यवस्था यु.जी.सी.ने केली.

ix. वार्षिक अनुदान - महाविद्यालय व विद्यापीठांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणा-या अनुदानाचा उपयोग महाविद्यालय व विद्यापीठीय कार्यक्रमांकरीता तसेच इमारतीमध्ये सुधारणा करण्याकरीता केला गेला. प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये वार्षिक अनुदान हे वेगवेगळे असते. दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालीलप्रमाणे वार्षिक अनुदान दिले जाते.

| अ.क्र. | वार्षिकोत्सवाचे स्वरुप | अनुदान |
|---|---|---|
| ०१ | १५० वे वर्ष साजरे करण्यासाठी | रु.१००.०० लाख |
| ०२ | १०० वे वर्ष साजरे करण्यासाठी | रु.७५.०० लाख |
| ०३ | ७५ वे वर्ष साजरे करण्यासाठी | रु.५०.०० लाख |
| ०४ | ५० वे वर्ष साजरे करण्यासाठी | रु.२५.०० लाख |
| ०५ | २५ वे वर्ष साजरे करण्यासाठी | रु.१०.०० लाख |

X. उजळणी वर्ग - याला रिफ्रेशर कोर्स असेही म्हणतात. याचा कालावधी २१ दिवसांचा असतो.व्यवसायात अद्ययावतता राखण्यासाठी ग्रंथपालाने हे वर्ग सुरु केले यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदान दिले जाते.

३. शासकिय अनुदान - राज्यशासन महाविद्यालयांना व विद्यापीठांना अनुदान देत असते.उदा.सेवकांचे वेतन व भत्ते तसेच परीक्षण अनुदान. या अनुदानातून उपलब्ध होणारी रक्कम ग्रंथालयावर खर्च केली जाते.

४. सामाजिक प्रतिष्ठान व इतर संस्थाकडून मिळणारे अनुदान व देणग्या - ग्रंथालयाच्या विकासासाठी सामाजिक प्रतिष्ठान व संस्था देणग्या देत असतात. गहू खरेदी योजनेंतर्गत भारताला १९५४ ते १९६२ या काळात १ लाख ७० हजार डॉलर रकमेचे अनुदान मिळाले. ग्रंथालयांनी अमेरिकन वाचनसाहित्य खरेदी करण्यासाठी ही रक्कम देण्यात आली होती.

५. वाचकांकडून घेतलेले शुल्क ग्रंथालय शुल्क व विलंब शुल्क - महाविद्यालयातील ग्रंथालयाचे विद्यार्थ्याकडून ग्रंथालय शुल्क आकारत असतात.हे शुल्क शासन संबंधीत विद्यापीठाची परिपत्रके यानुसार आकारले जाते. वाचनसाहित्य परतीच्या ठराविक दिनांकानंतर वाचनसाहित्य परत केल्यास वाचकांना विलंब शुल्क आकारले जाते. वाचनसाहित्य संबधीताकडून गहाळ झाल्यास किंमत वसुल केली जाते.अथवा खराब झाल्यास किंमत व बदलात्मक स्वरुपाचे वाचनसाहित्य घेतले जाते.

६. ग्रंथालय सेवा शुल्क - ग्रंथालयाव्दारे वाचकांना दिल्या जाणा-या सेवांसाठी शुल्क आकारले जाते उदा. झेरॉक्स, मायक्रोफिल्मीग, आंतरग्रंथालयीन देवघेव, भाषांतर, इंटरनेट इ.सेवांसाठी शुल्क आकारले जाते.

७. इतर मार्ग- ग्रंथालयाची प्रकाशने व रददी विक्री याव्दारे ग्रंथालयास निधी उपलब्ध होत असतो. अशाप्रकारे महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे आर्थिक स्त्रोत स्पष्ट होतात.

८. मागासवर्गीय पुस्तक पेढी योजना - मुंबई विद्यापीटाच्या विद्यार्थी कल्याण विभागातर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजनेखाली दर शैक्षणिक वर्षाकरीता अनुदानाची तरतुद केली जाते.महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार त्या महाविद्यालयाने विद्यार्थी कल्याण विभागाकडे मागणी केल्यास पुस्तक पेढी योजने खाली अनुदानीत रक्कमेचे वाटप केले जाते.

९. आमदार खासदार निधीच्या माध्यमाव्दारे - आमदार व खासदार यांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिला जातो. संस्थेला अशानिधीतून आर्थिक मदत केली जाते.वाचन साहित्य खरेदी संगणकखरेदी इमारत याकरीता सहाय्य मिळू शकते.

१०.अर्थसंकल्पातून - ग्रंथालयासाठी मान्यकरण्यात आलेल्या ठराविक रक्कमेतून विद्यापीट किंवा महाविद्यालय ग्रंथालयसमिती, ग्रंथखरेदी, नियतकालिकांची वर्गणी भरणे, सेवकांना पगार व भत्ते, स्टेशनरी, बांधणी व इतर कामासाठी रक्कमेचे वाटप करीत असते.

११ कात्रणसेवाव्दारे - वर्तमानपत्रात येणारे रोजगार संबधी जाहिराती किंवा स्पर्धात्मक परिक्षेसंबंधी जाहिराती इ. प्रतिलिपी काढून ग्रंथालयातर्फे अल्पशा किंमतीत विकल्यास ग्रंथालयासाठी निधी गोळा करता येईल.

१२. अनामत रक्कमेवरील व्याज - विद्यार्थ्याकडून घेतलेली अनामत रक्कम विद्यार्थी जेव्हा सोडून जाईल तेव्हा परत करावयाची असल्याने ती ठेवीच्या स्वरुपात गुंतवून त्यावर व्याज कमावले जाते.

१३.पुस्तकपेढी निधीव्दारे - महाविद्यालयाव्दारे ग्रंथालयातून पुस्तकपेढी योजनेंतर्गत काही विद्यार्थी लाभान्वयीत होत असतात त्यासाठी निर्धारीत रक्कम अनामत शुल्क म्हणून घेतली जाते. त्यातून काही रक्कम सेवाशुल्क म्हणून कपात करुन बाकी रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्यात येते.

१४.दुरध्वनी व फॅक्सव्दारे- ग्रंथालयाच्या प्रवेशव्दारावर कॉईनबॉक्सची सोय उपलब्ध करुन ग्रंथालयासाठी निधी उपलब्ध करता येईल तसेच फॅक्सचे दर बाहेरच्यापेक्षा कमी दरात उपलब्ध करुन उत्पन्न मिळवता येईल.

१५.अशासकिय धमार्थ संस्थांकडून मिळणारी अनुदाने - अनेक धमार्थ विश्वस्त यांच्याकडून उदा.सिदधीविनायक प्रतिष्ठान अनावर्ती तसेच आवर्ती अनुदान मिळविणे हे त्याबाबत ग्रंथपालाने घ्यावयाच्या पुढाकारावर अवलंबून असते.

स्वयंनिर्मीत आर्थिक स्त्रोत - अलिकडे काही महाविद्यालयीन ग्रंथालयांना शासनाकडून वा युजीसी कडून मिळणारे अनुदान वा आर्थिक स्त्रोत पुरेसे पडत नसल्यामुळे ते स्वयंनिर्मीत आर्थिक स्त्रोतांकडे वळलेले आहेत यांचे स्वरुप खालील प्रमाणे ञ्

- वर्ग भाडयाने देवून - महाविद्यालयाचे वर्ग सायंकाळी रिकामी असतात.तेव्हा समाजातील विविध संघटना, छंद, कलावर्ग चालविण्याकरीता वर्ग भाडयाने देवून निधी उभारता येतो.
- संगणक प्रशिक्षण वर्ग - इंटरनेटवरुन नेमकी माहिती कशी शोधावी हे ब-याच जणांना माहिती नसते जर संगणकाचे इतर माहिती सोबत प्रशिक्षण दिले गेले तर निश्चित उत्पन्न मिळू शकेल.
- ग्रंथालय वाचकमंच - ग्रंथालय वाचक मंच स्थापून सदस्य व ग्रंथालय विकासासाठी त्याच्या सहाय्याने संगीताचे, नाटकाचे असे कार्यक्रम योजून सभासदांचे वाढदिवस समारंभ साजरे करुन निधी उभारता येतो.
- ग्रंथालय परिचय पुस्तक तयार करणे - आपल्या ग्रंथालयाचे परिचय पुस्तक तयार करुन या पुस्तकात नियमावली, ग्रंथालयात उपलब्ध मासिकांची सूची पुरविल्या जाणा-या संदर्भसेवेची माहिती ग्रंथालय आज्ञवालीव्दारे देता येते. यापुस्तीकेचे निर्धारीत मुल्य ठेवून विकले गेले तर वाचकवर्गाचा प्रतिसाद मिळेल व उत्पन्न मिळेल.
- उदबोधन वर्गाव्दारे - ग्रंथालयाव्दारे ग्रंथपालाने काही तज्ज्ञ व्यक्तिशी संपर्क साधून अक्षर कसे सुधारावे, लेखन वाचन कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, वक्तृत्व कला यासारखी कार्यशाळा घेता येईल व याकार्यशाळेचे प्रतिव्यक्तीप्रमाणे शुल्क घेता येते. आणि निधी संकलीत करता येतो.

माजी विद्यार्थी संघटना - या संघास ग्रंथालयाने सक्रीय सहभाग देवून संघाकडून निधी संकलनासाठी उपयोग होवू शकतो.उदा. उच्च पदस्थ व परदेशात नोकरी व्यवसाय करणा-या माजी विद्यार्थ्याच्या सहकार्याने पैसा व अन्य स्वरूपात निधी संकलीत करता येतो.संघटना व सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने मोठयाप्रमाणात निधी प्रकल्प राबवता येईल.

स्थानिक स्वराज्य संस्था अनुदान ञ् ग्रंथालय हे समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. पदवी प्राप्त विद्यार्थी समाजाच्या विकासाचा दर्जा वाढवित आहेत. अशा समाजाची सेवा व नियंत्रण स्थापन स्वराज्य संस्था करीत असतात. अशा संस्थेने इतर करांसोबत सुयोग्य रक्कमेचा शैक्षणिक संस्था विकास कर आकारला व तो त्या अधिक क्षेत्रातील संस्थांना प्रतिवर्षी अनुदान रुपात दिला तर महाविद्यालयास तसेच ग्रंथालयास निधी उपलब्ध होईल.

स्थायी निधी उभारणे व गुंतवणूक- वर सांगितलेल्या मार्गाने उपलब्ध होणारा पैसा स्थायी निधीत जमाकरुन त्यातील प्रमाणित भाग ग्रंथालय विकासावर खर्च करावा व उर्वरित भाग राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र योजनेत प्रतिवर्षी गुंतवल्यास त्यापुढील प्रत्येक वर्षी दामदुप्पटीतील निम्मी रक्कम भागवण्यासाठी खर्च करता येईल. म्हणजेच निम्मी रक्कम अनुदाना करीता अव्याहतपणे मिळत राहिल.


**संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण**

माहिती संकलनासाठी रत्नागिरी जिल्हयातील नऊ तालुक्यातील महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेट दिली व त्यातील माहिती संकलीत केली.

महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या आर्थिक स्त्रोतांचा अभ्यास करताना प्रत्येक महाविद्यालयातील ग्रंथपालाना प्रश्नावली वितरीत करण्यात आली होती.कला, वाणिज्य व विज्ञान या विभागातील १५ महाविद्यालयापैकी १२ महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला त्या आधारे प्रश्नावलीचे तक्ते व आलेख यांव्दारे विश्लेषण केले आहे.

**१.महाविद्यालय व स्थापना वर्ष -**

| अ.क्र. | सांकेतिक चिन्ह | महाविद्यालयाचे नाव | स्थापना वर्ष |
|---|---|---|---|
| १ | A | खरे-ढेरे महाविद्यालय, गुहागर | १९९२ |
| २ | B | डी.बी.जे.महाविद्यालय, चिपळूण | १९६५ |
| ३ | C | गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी | १९४५ |
| ४ | D | न्या.आठल्ये सप्रे पित्रे कॉलेज,देवरुख | १९७२ |
| ५ | E | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांजा | १९९६ |
| ६ | F | आय.सी.एस.महाविद्यालय, खेड | १९९० |
| ७ | G | मनोहरी हरी खापणे महाविद्यालय, पाचल | १९९४ |
| ८ | H | डॉ.तात्यासाहेब नातू महाविद्यालय, मार्गताम्हाणे | १९९२ |
| ९ | I | पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | १९९१ |
| १० | J | मंडणगड महाविद्यालय, मंडणगड | १९९६ |
| ११ | K | दापोली अर्बन बँक सिनीअर महाविद्यालय, दापोली | १९९६ |
| १२ | L | आबासाहेब मराठे कला, वाणिज्य व विज्ञान महा, राजापूर | १९९४ |
| १३ | M | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साखरपा | २००४ |
| १४ | N | नवनिर्माण महाविद्यालय, रत्नागिरी | २००१ |
| १५ | O | वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली. | १९९६ |




Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

**२.महाविद्यालयाचे स्वरूप -**


| अ.क्र. | स्वरुप | महाविद्यालयाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गर्व्हमेंट | - | - |
| २ | प्रायवेट -एडेड | १२ | १००% |
| ३ | प्रायवेट -अन एडेड | - | - |

या मधील आकडेवारी नुसार रत्नागिरी जिल्हयातील १२ महाविद्यालये प्रायवेट एडेड आहेत.





**३.ग्रंथालयाचे सभासदत्व -**

| अ.क्र. | सांकेतांक | प्राध्यापक | शिक्षकेतर कर्मचारी | पदव्योत्तर विद्यार्थी | पदवी पर्यंतचे विद्यार्थी | संशोधक | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | A | २५ | ०८ | - | ७६५ | - | ०३ | ८०१ |
| २ | B | १६७ | ५७ | ५०० | ६००० | | ४० | ६७६४ |
| ३ | C | २०४ | ७५ | १००० | ८००० | | ८० | ९३६९ |
| ४ | D | ३१ | १५ | | ११०० | | ०२ | ११४८ |
| ५ | E | ३० | १४ | २० | १०३४ | - | ०५ | ११०३ |
| ६ | F | ३४ | १३ | | ६३४ | | ०३ | ६८४ |
| ७ | G | १५ | ०७ | | २२६ | | ०२ | २५० |
| ८ | H | १६ | ०८ | | ३६५ | | ०३ | ३९२ |
| ९ | I | ११ | ०८ | | ४६४ | | ०१ | ४८४ |
| १० | J | २५ | ११ | - | ३४९ | - | २२ | ४०७ |
| ११ | K | १७ | १२ | | ६०० | | १२ | ६४१ |
| १२ | L | २५ | ११ | | ४०० | | - | ४३६ |




**४.मागील पाच वर्षाचे अंदाजपत्रक निहाय तक्ता -**

| अ.क्र. | सांकेतांक | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | A | १०५३८६.३३ | ११३४३९.९० | १२०५४९.४१ | १३४७३२.१२१ | १४५६०३.३५ |
| २ | B | ८८९९२८.९९ | ९५७९३६.९४ | १०१७९७२.८० | ११३७७३७.९१ | १२२९५३९.४४ |
| ३ | C | १२३२६६४.८१ | १३२६८६४.४५ | १४१००२१.७६ | १५७५९११.६७ | १७०३०६८.४५ |
| ४ | D | १५१०४०.५८ | १६२५८३.०३ | १७२७७२.४४ | १९३०९९.२२ | २०८६७९.९६ |
| ५ | E | १४५१२०.०० | १५६२१०.०० | १६६०००.०० | १८५५३०.०० | २००५००.०० |
| ६ | F | ८९९९२.८२ | ९६८७०.०३ | १०२९४१.०७ | ९६४४८.३४०९ | १२४३३५.४५ |
| ७ | G | ३२८९२.११ | ३५४०५.७१ | ३७६२४.६६ | ३५२५१.५८६६ | ४५४४४.२४ |
| ८ | H | ५१५७४.८३ | ५५५१६.१६ | ५८९९५.४७ | ५५२७४.४८७८ | ७१२५६.५७ |
| ९ | I | ६३६७९.१३ | ६८५४५.४६ | ७२८४१.३४ | ६८२४७.०७१६ | ८७९८०.०५ |
| १० | J | ५३५४८.३६ | ५७६४०.५० | ६१२५२.९५ | ५७३८९.५८३ | ७३९८३.२३ |
| ११ | K | ८४३३५.३८ | ९०७८०.२४ | ९६४६९.६३ | ९०३८५.०६८ | ११६५१९.०४ |
| १२ | L | ५७३६३.८४ | ६१७४७.५६ | ६५६१७.४१ | ६१४७८.७६७ | ७९२५४.७६ |



**५.आर्थिक स्त्रोताव्दारे जमा रक्कम**

| अ.क्र. | सांकेतांक | ग्रंथालय शुल्क | ग्रंथालय दंड | वर्तमानपत्रे रददी विक्री | गहाळ पुस्तके | ग्रंथालय सेवा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | A | ५०००० | ३०० | १२०० | ५०० | | ५२०००० |
| २ | B | १८१००० | १११७७ | ४०० | १६८३ | ४६३७ | १९८८९७ |
| ३ | C | ५२५००० | ५०० | १००० | - | ४४६०० | ५७११०० |
| ४ | D | - | - | - | - | - | - |
| ५ | E | ९०००० | ५५२ | ५०० | ११०० | ६२८५ | ९८४३७ |
| ६ | F | ९६२५० | - | ८६० | १३४० | - | ९८४५० |
| ७ | G | - | - | - | - | - | - |
| ८ | H | - | - | - | - | - | - |
| ९ | I | - | - | - | - | - | - |
| १० | J | २९४०० | - | ५१० | - | - | २९९०० |
| ११ | K | - | - | | - | - | |
| १२ | L | ३०००० | ५०० | ६०० | - | - | ३१००० |

**६.आर्थिक विनियोगाच्या समस्या -**

| **अ.क्र.** | **समस्येचे स्वरुप** | **महाविद्यालय** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १ | वाचनसाहित्याची खरेदी | A,B,C,D,E,F,G,H,I,J ,K,L = १२ | १००% |
| २ | वर्षाअखेरीचे अनुदान विनीयोग व सकलगुणवत्ता | D,E,F,G,H,I,J,K =०८ | ६६% |
| ३ | उपस्कारणातील ताण | D,E,F,G,H,I,J,K =०८ | ६६% |

या समस्येमध्ये उशिरा अनुदान प्राप्त झाल्यास शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस वाचनसाहित्य खरेदी करणे शक्य होत नाही. यामुळे ग्रंथनिवड करीत असताना सकल गुणवत्तचे अवलंब करणे शक्य होत नाही. व यामुळे उपस्कारण प्रक्रीयेत कर्मचारी वर्गावर ताण पडून तिचा दर्जा सांभाळता येत नाही असे पर्याय दिले होते. या पर्यायाचे विश्लेषण वरील तक्त्यात करण्यात आले होते. A,B,C ही महाविद्यालये वाचन साहित्य खरेदी संदर्भात समस्येचे नोंद करतात.तर उर्वरीत D,E,F,G,H,I,J,K महाविद्यालये तीन्ही समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**७.विद्यार्थी शुल्क व अनामत शुल्क -**

| अ.क्र. | समस्येचे स्वरुप | महाविद्यालय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | स्थानिक प्रशासकीय पातळीवर वाचनसाहित्य खरेदीच्या मागणीसाठी विलंब झाल्याने आवश्यक ते वाचनसाहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण शक्य होत नाही. | D,E,F,G,H =०५ | ३३.३३% |
| २. | वाचनसाहित्य शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध न झाल्यास त्याचा अध्ययन व अध्यापन प्रक्रियेवर अनिष्ट परिणाम होतात. | A,B,C, D = ०४ | ३३.३३% |
| ३. | प्रसंगोपात मंजूरी शैक्षणिक वर्षाच्या अखेरच्या टप्प्यात मंजूरी मिळाल्यास गुणवत्ता पुर्ण वाचनसाहित्य उपलब्ध होत नाही व ते विद्यार्थी वाचकांना वेळेवर उपलब्ध न झाल्याने विद्यार्थी वाचकांत असंतोष निर्माण होतो. | A,B,C,D,E, F,G,H,I,J,K, L=१२ | १००% |

या संस्थेमध्ये स्थानिक प्रशासकीय पातळीवर वाचनसाहित्य खरेदिच्या मागणीसाठी विलंब झाल्याने आवश्यक ते वाचनसाहित्य खरेदिच्या मागणीसाठी विलंब झाल्याने आवश्यक ते वाचनसाहित्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. ही समस्या एकूण ५ महाविद्यालयांना जाणवते. D,E,F,G,H अशी ती महाविद्यालये आहेत. त्यांची टक्केवारी ५५% अशी आहे. वाचनसाहित्य शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध न झाल्यास त्याचा अध्ययन प्रक्रियेवर अनिष्ट परिणाम होतात अशा समस्या ४ महाविद्यालयांना जाणवते. A,B,C,D ही महाविद्यालये आहेत. ४४ % अशी त्यांची टक्केवारी आहे. तर प्रसंगोपात मंजुरी शैक्षणिक वर्षाच्या अखेरच्या टप्प्यात मंजूरी मिळाल्यास गुणवत्ता पूर्ण वाचनसाहित्य उपलब्ध होत नाही व ते विद्यार्थी वाचकांना वेळेवर उपलब्ध न झाल्याने विद्यार्थी वाचकात असंतोष निर्माण होतो अशी समस्या महाविद्यालयाला जाणवते त्याची टक्केवारी १०० % आहे.

**निष्कर्ष -**

१ रत्नागिरी जिल्हयातील महाविद्यालये ही कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील आहेत.

२ रत्नागिरी जिल्हयातील प्रतिसादक महाविद्यालये ही मान्यताप्राप्त अनुदानीत महाविद्यालये आहेत.

३ गोगटे- जोगळेकर व डी.बी.जे.महाविद्यालय,चिपळूण या महाविद्यालयात सहायक ग्रंथपाल, लायब्ररी क्लर्क, ग्रंथालय परिचर, शिपाई ही पदे भरलेली आहेत.

४ ७ महाविद्यालयांमध्ये ग्रंथालयाचे अंदाजपत्रक बनविले जाते.स्थानिक व्यवस्थापन समिती ते अंदाजपत्रक मंजूर करते.

५ आटल्ये सप्रे महाविद्यालय, देवरुख, डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण, गोगटे- जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी गेल्या पाच वर्षामध्ये यु.जी.सी.अंतर्गत अनुदान मिळाले आहे.तर खरे ढेरे महाविद्यालय, गुहागर या महाविद्यालयात सन २००६ ज्र ०७ पासून यु.जी.सी. अनुदान मिळाले आहे.

६ संस्थेकडून अनुदान हे डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण यांना मिळाले आहे. ग्रंथालय शुल्क हे २००/-प्रत्येक विद्यार्थ्यावर आकारण्यात आले. त्यानुसार गोगटे- जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी व डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण यांची विद्यार्थी संख्या जास्त असल्याने जास्त निधी उपलब्ध झाला.त्याचप्रमाणे ग्रंथालय दंड, वर्तमानपत्र रददी विक्री, ग्रंथालय सेवा याव्दारे निधी संकलन केले जाते.

७ वाचनसाहित्य संग्रहामध्ये गोगटे- जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरीचा पहिला क्रमांक लागतो व डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूणचा दुसरा क्रमांक लागतो. यात सर्व वाचनसाहित्य म्हणजे ग्रंथ, नियतकालीके, ग्रंथेतर साहित्य, नकाशा विडिओ, ऑडिओ कॅसेट सर्वत्र उपलब्ध आहेत.त्यानंतर आटल्ये सप्रे महाविद्यालय, देवरुख, खरे ढेरे महाविद्यालय, गुहागर व खेड महाविद्यालयाचा क्रमांक लागतो. सर्वात कमी वाचन साहित्यसंग्रह पाचल महाविद्यालय, पाचल यांचा लागतो.

८ स्वायत्त संस्थेव्दारे अनुदान प्राप्त झाल्यास त्या अनुदानाचा विनीयोग करीत असताना सर्व निकषांचे काटेकोर पालन करताना गुहागर महाविद्यालय, डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण, गोगटे- जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी या तिन महाविद्यालयांना तडजोड करावी लागते.तसेच सर्वच निकषांचे पालन करणे शक्य होत नाही. असे गुहागर, देवरुख, लांजा, पाटपन्हाळे व पाचल या महाविद्यालयांना वाटते. वाचकांना वाचनसाहित्य व भौतीक सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही असे डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण, खेड महाविद्यालय यांना वाटते.

९ गोगटे- जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी ग्रंथ व नियतकालीकांसाठी जास्त रक्कम खर्च करते. त्यानंतर अनुक्रमे डी.बी.जे. महाविद्यालय, चिपळूण, देवरुख, खेड, गुहागर ही महाविद्यालये खर्च करतात. सर्वात कमी खर्च पाचल महाविद्यालय करते.

१० गुहागर, चिपळूण, रत्नागिरी, देवरुख, लांजा, खेड ही महाविद्यालये झेरॉक्स व संगणक सुविधा उपलब्ध करुन देतात. पाटपन्हाळे, मंडणगड व पाचल या महाविद्यालयामध्ये या सुविधा नाहीत.

**शिफारशी -**

१ ग्रंथालयाच्या सेवा अधिक दर्जेदारपणे उपलब्ध करुन देण्यासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करुन दयावा.त्यासाठी स्वयं आर्थिक निर्मितीची साधने निर्माण करावी तसेच स्वायत्त संस्था व व्यक्ती यांच्याव्दारे निधी उपलब्ध करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करावे.

२ ज्या महाविद्यालयांमध्ये यु.जी.सी.अनुदान मिळत नाही त्यांनी अनुदानासाठी विशेष प्रयत्न करावेत व इमारत तसेच संगणक सुविधे करीता अनुदान मिळविण्याचा प्रयत्न करावा.

३ अनुदान शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच मिळविण्यासाठी प्रयत्न करावा.

४ ज्ञानामध्ये अद्ययावतता आणण्यासाठी जास्तीत जास्त मासिके व नियतकालीके खरेदी करण्यात यावी.

५ आर्थिक विनियोग प्रक्रिये मध्ये ग्रंथपाल व ग्रंथालय समिती यांना समाविष्ट करुन घेतले पाहिजे.

६ ग्रंथालय विभाग व प्रशासन विभाग यांमध्ये योग्य समन्वय असावा.

७ ग्रंथ निवड करताना सकल गुणवत्तेचा अवलंब करावा.

८ आवश्यक ते वाचनसाहित्य शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस उपलब्ध करुन देण्यात यावे त्यामुळे अध्ययन व अध्यापनास पोषक वातावरण तयार होईल.

९

**संदर्भ -**

१. " मनुष्यबळ तरतूद " - ज्ञानगंगोत्री, मार्च -एप्रिल-मे २००२.
२. निकोसे सत्यप्रकाश, आधुनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन, नागपूर, प्रज्ञा प्रकाशन, २००७
३. बुवा, जी.ए., ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यवस्थापनाचे नवे प्रवाह, बांदा: साई प्रकाशन, २००७
४. Kumar, P.S.G, Management of Library & Information Centers, Nagapur B.R.Publishing, २००२ .
५. Kuffalikar,C.R. SWOT A keyto Accreditation, Wardha- Challenging Role of Academic Libraries in Higher Education, २००३.
६. Krishna, Murthy, R,Library management, New Delhi, Commonwealth Pub,१९९७.
७. Faruqui,Khalid F, Planning Budget in Libraries ; New Delhi: Anmol Publication, १९९७
८. निकोसे, सत्यप्रकाश, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती, प्रज्ञा प्रकाशन.
९. Khandare, Rahul, Application of ICT In Libraries, Pimpalapure Prakashan.
१०. Raval, Ajay Kumar, Academic Library Automation, Pimpalapure Prakashan.
११. सुनिलकुमार, २००७, पुस्तकालय संगठन एवं वित्त प्रबंध, नई दिल्ली, डिस्कवरी पब्लि.